विभाग : अकौन्टस् दिनांक : २७/०३/२०२६

**विषय : बँकेच्या मयत ठेवीदार / खातेदार / लॉकर खातेदार, दाव्यांच्या निकाली काढणेसंबंधी धोरण / कार्यपध्दती बाबत...**

**कार्यालयीन टिप्पणी**

**सन्मा.अध्यक्ष,**
**व्यवस्थापक मंडळ**
यांजकडे सविनय सादर ---

भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिशानिर्देश क्र. २९२ दि. २८/११/२०२५ नुसार बँकांच्या मयत ठेवीदार / खातेदार / लॉकर खातेदार यांच्या दाव्यांच्या निकाली काढणेसंबंधी सूचना दिलेल्या असून, त्यायोगे बँकांनी स्वत:चे धोरण / कार्यपध्दती ठरवून त्यानुसार मयत ठेवीदार / खातेदार / लॉकर खातेदार यांचे दावे लवकरात लवकर निकाली काढण्यास व संबंधीत रक्कम त्यांच्या वारसदारांना मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ग्राहक सेवेच्या गुणवत्तेत देखील सुधारणा होण्यास मदत होईल. याबाबतीत भारतीय रिझर्व्ह बँकेने वारसनोंद असणाऱ्या तसेच वारसनोंद नसणाऱ्या अशा दोन्हीबाबतीत कोण कोणते फॉर्म्स द्यावयाचे तसेच त्या फॉर्म्सचे नमुने दिलेले आहेत. त्यामुळे आता सर्व बँकांमध्ये कार्यपध्दतीत एकसंघपणा दिसून येईल.

आपल्या बँकेने वरील सूचनांचे अवलोकन करुन स्वत:ची एक कार्यपध्दती ठरवून घेऊन ती मा. संचालक मंडळ यांच्या दि. ३०/०३/२०२६ च्या सभेतील ठराव क्र. २/५ नुसार मंजूर करुन घेतली असून, त्याची कार्यपध्दती (SOP) पुढील प्रमाणे राहील.

**१) वारस नोंद असणाऱ्या मयत खातेदार / ठेवीदार यांच्या दाव्यांबाबत.**
(सभासद असणाऱ्या मयत खातेदार / ठेवीदार यांच्याबाबत)

**अ) शेअर्स :-**

शाखांनी याबाबतीत शेअर्स रक्कमेबाबतचा पूर्वीचा फॉर्म नंबर १६५ भरुन घेवून मुख्य कार्यालयाकडे पाठविणेचा आहे. त्यासोबत सभासदाचा मृत्यु दाखला, वारसांची के.वाय.सी. उदा. आधार / वाहन परवाना / पासपोर्ट / निवडणूक ओळखपत्र इत्यादी तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घेवून मुख्य कार्यालयाकडे पाठवावे. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील कलम २५(३)(१) नुसार मुख्य कार्यालयाकडून मयत सभासदांच्या शेअर्स जिंदगी बाबतीत १५ दिवसांची नोटीस देण्यात येईल व त्यानंतरच शेअर्सची रक्कम वारसांना देण्यात येईल. मयत खातेदारांची कर्ज / जामीनकी जबाबदारी असेल तर सदरची जबाबदारी पूर्ण झालेशिवाय वारसांचा अर्ज स्वीकारता येणार नाही.

**ब) ठेवी :-**

वारस नोंद असणाऱ्या तसेच सभासद / बिगर सभासद, मयत खातेदार / ठेवीदार यांची ठेव

रक्कम शाखांनी शाखा पातळीवरच वारसदारांना देणेची आहे. वारस नोंद असणाऱ्या ठेवींबाबत ठेवींची रक्कम कितीही असो त्याचे अधिकार हे शाखाधिकारी / शाखेतील वरिष्ठ अधिकारी यांना असतील. वारसनोंद असणाऱ्या ठेवींची रक्कम वारसांना देताना शाखांनी खालील गोष्टींची पूर्तता करावी.

१) मयत ठेवीदार / खातेदाराचा मृत्यु दाखला.

२) फॉर्म V- वारसदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म. (रक्कम ज्याला मिळणार आहे.)

३) वारसाची के.वाय.सी. उदा. आधार/ वाहन परवाना / पासपोर्ट / निवडणूक ओळखपत्र इत्यादी तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घेण्यात यावे.

वारसनोंद असणाऱ्या ठेव खात्याची रक्कम संबंधित वारसाला देण्यापूर्वी कोर्टाकडून शाखेला संबंधित रक्कम कशा प्रकारे द्यावी याबाबतचा आदेश प्राप्त झाल्यास शाखेने कोर्ट आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

संयुक्त ठेव खात्यांबाबत (Joint A/c) शाखांनी ठेव ही

१. Former or Survivor,

२. Either or Survivor,

३. Anyone or Survivor,

४. Later or Survivor

या स्वरुपात असल्यास हयात असणाऱ्या ठेवीदाराला / खातेदाराला रक्कम देण्यास हरकत नाही.

संयुक्त नावाने असणारी मुदत ठेव जर मुदतपूर्व मोडायची झालेस आणि ती ठेव With or without Survivorship clause या स्वरुपात जरी असली तरी मयत ठेवीदाराच्या वारसांची संमती आवश्यक आहे. मात्र अकौन्ट ओपनिंग करताना सर्व संयुक्त ठेवीदारांनी मुदतपूर्व रक्कम मोडणेसंदर्भातील मॅन्डेट दिले असेल तर मयत ठेवीदाराच्या वारसांच्या संमतीची आवश्यकता नाही.

मयत ठेवीदाराची ठेव मुदतपूर्व बंद करताना बँक कोणतेही दंडात्मक शुल्क लावणार नाही, तसेच त्यासंदर्भात आवश्यक ती टिप अकौन्ट ओपनिंग फॉर्ममध्ये समाविष्ठ करुन घेतली आहे.

**२) वारसनोंद नसणाऱ्या मयत खातेदार / ठेवीदार यांच्या दाव्यांबाबत.**

(सभासद असणाऱ्या मयत खातेदार / ठेवीदार यांच्याबाबत)

**अ) शेअर्स :-**

वरीलप्रमाणे परिच्छेद अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शेअर्सबाबत कार्यवाही करावी व खालीलप्रमाणे कागदपत्रे मुख्य कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठवावीत.

१. फॉर्म नंबर १६५

२. सभासदाचा मृत्यु दाखला

३. रक्कम कोणाला द्यावी याचे वारसांचे नोटराईज्ड ॲफिडेव्हीट (संमतीपत्र)

४. इन्डेम्नीटी बॉण्ड ₹ ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर. (ज्याला रक्कम मिळणार आहे)

५. वारसांची के.वाय.सी. उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडणूक ओळखपत्र इत्यादी तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे.

**ब) ठेवी :-**

वारसनोंद नसणाऱ्या सभासद / बिगर सभासद, मयत खातेदार / ठेवीदार ठेव रक्कमेबाबत आपल्या बँकेने मर्यादा रक्कम (Threshold Limit) निश्चित केली असून, त्याची रक्कम रु. १० लाख इतकी आहे. याचाय अर्थ असा की, रु. १० लाखांवरील वारसनोंद नसलेले दावे निकाली काढताना वारसांकडून उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) बंधनकारक असेल. काही अपवादात्मक परिस्थितीत जसे की वारसात मतभेद नाहीत, तसेच वारस हे जवळच्या रक्ताच्या नात्यातील असतील तसेच बँकेच्या परिचयाचे असतील तर अशा बाबतीत उत्तराधिकार प्रमाणपत्र न घेता दावा निकाली काढण्याचे अधिकार हे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

वारसनोंद नसलेल्या मयत खातेदार / ठेवीदार यांचे दावे निकाली काढताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती शाखांनी / मुख्य कार्यालयाकडील हिशोब विभागाने पूर्ण करावी.

१) सर्व कागदपत्रांची वारसांकडून पुर्तता झाल्यानंतरच शाखांनी दाव्यासंदर्भातील कागदपत्रांची आवक (Inward) करावी.

२) आवश्यक असणारे इंडेम्नीटी बॉण्ड /लेटर ऑफ डिस्क्लेमर किंवा नो ऑब्जेक्शन यांना योग्य प्रमाणात स्टॅम्प पेपर वारसांकडून लावण्यात आले आहेत का याची खात्री करुन मगच स्विकारावेत.

वारसनोंद नसलेल्या ठेवींबाबत आवश्यक कागदपत्रे, स्टॅम्प, मंजूरी अधिकार व रक्कम मर्यादा यांची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | दावा रक्कम (व्याजासहित) | आवश्यक कागदपत्रे | | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | रु. ३.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म VI- रक्कम ज्याला मिळणार आहे. | -- | शाखाधिकारी किंवा शाखेतील वरिष्ठ अधिकारी |
| | | २ | मृत्यु दाखला | -- | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म VII) वारसांनी भरुन द्यावयाचा. | ५००/- | |
| | | ५ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | ६ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |

| अ. क्र. | दावा रक्कम (व्याजासहित) | | आवश्यक कागदपत्रे | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| २. | रु. ३.०० लाख ते रु. १०.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) रक्कम ज्याला मिळणार आहे. | -- | उपसरव्यवस्थापक |
| | | २ | मृत्यु दाखला | -- | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म VII) वारसांनी भरुन द्यावयाचा. | ५००/- | |
| | | ५ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | ६ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| ३. | रु. १०.०० लाख ते रु. २५.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) रक्कम ज्याला मिळणार आहे. | -- | सरव्यवस्थापक |
| | | २ | मृत्यु दाखला | | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate)<br>किंवा<br>वारसात मतभेद नसतील व वारस जवळच्या रक्ताच्या नात्यातील असतील तसेच बँकेच्या परिचयाचे असतील तर अपवादात्माक परिस्थितीत उत्तराधिकारी प्रमाणपत्र ऐवजी खालील प्रमाणे कागदपत्रे घेता येतील | -- | |
| | | अ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म VII) वारसांनी भरुन द्यावयाचा व जामीनदाराने भरुन द्यावयाचा. | ५००/- +५००/- | |
| | | ब | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | क | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>नोटेराईज्ड डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |

| अ. क्र. | दावा रक्कम (व्याजासहित) | | आवश्यक कागदपत्रे | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| ४. | रु. २५.०० लाख ते रु. ५०.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) रक्कम ज्याला मिळणार आहे. | -- | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | २ | मृत्यु दाखला | | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate)<br>किंवा<br>वारसात मतभेद नसतील व वारस जवळच्या रक्ताच्या नात्यातील असतील तसेच बँकेच्या परिचयाचे असतील तर अपवादात्माक परिस्थितीत उत्तराधिकारी प्रमाणपत्र ऐवजी खालील प्रमाणे कागदपत्रे घेता येतील. | -- | |
| | | अ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म VII) वारसांनी भरुन द्यावयाचा व जामीनदाराने भरुन द्यावयाचा. | ५००/- +५००/- | |
| | | ब | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | क | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>नोटेराईज्ड डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| ५. | रु. ५०.०० लाखांवरील | | वरीलप्रमाणे क्र. ४ मध्ये नमूद सर्व कागदपत्रे | वरीलप्रमाणे क्र. ४ मध्ये नमूद स्टॅम्प | मा. संचालक मंडळ |
| ६. | १ ते ५ मधील मर्यादेनुसार | | **<u>मृत्यु पत्राचे आधारे</u>** | -- | १ ते ५ मधील मर्यादेनुसार |
| | | १ | मृत्यु पत्रात नांव असलेल्या वारसाकडून / अन्य व्यक्तीकडून फॉर्म- VI | | |
| | | २ | मृत्यु दाखला | -- | |
| | | ३ | मृत्युपत्रातील नांव असलेल्या व्यक्तीची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | मृत्युपत्र (Will) | -- | |
| | | ५ | मृत्युपत्राच सत्यता तसेच शेवटचे असल्याबाबत कोर्टाकडून मिळणारे लेटर ऑफ प्रोबेट / लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन | -- | |

| अ. क्र. | दावा रक्कम (व्याजासहित) | | आवश्यक कागदपत्रे | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| ७. | १ ते ५ मधील मर्यादेनुसार | १ | **हरविलेल्या खातेदार / ठेवीदारांबाबत** वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) रक्कम ज्याला मिळणार आहे. | -- | १ ते ५ मधील मर्यादेनुसार |
| | | २ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ३ | दावा रक्कम रु. १.०० लाखापर्यंत असल्यास FIR व Non Traceable Report- पोलीस विभागाने दिलेला.<br>दावा रक्कम रु. १.०० लाखाच्या वर असल्यास कोर्टाकडून मिळालेला Civil Death चा आदेश | -- | |
| | | ४ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म VII) वारसांनी भरुन द्यावयाचा / जामीनदाराने भरुन द्यावयाचा **(दावा रक्कम रु. २५ लाखाचे वर असलेस स्वतंत्र जामीनदारासाठीचा रु. ५००/- चा स्टॅम्प)** | ५००/- | |
| | | ५ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | ६ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |

३) मयत खातेदार / ठेवीदार यांचे दावे निकाली काढल्यानंतर जर संबंधित मयत खातेदाराच्या खात्यात जमा होण्यासाठी कोणतीही रक्कम आल्यास बँकेने Account holder deceased अशी टिप्पणी लिहून ती परत पाठवावी तसेच वारसदारांना याबाबत माहिती द्यावी.

४) **दावा निकाली काढण्यासाठी लागणारा कालावधी :-**

सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेला दावा शाखेकडे प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत तो निकाली काढणे बँकेसाठी बंधनकारक आहे.

५) **उशीरा निकाली निघणाऱ्या दाव्यांसाठी द्यावी लागणारी भरपाई :-**

बँकेकडून १५ दिवसानंतर दावा निकाली निघाल्यास बँकेने संबंधित वारसांना जितक्या दिवस उशीरा दावा निकाली निघाला त्या दिवसांना प्रचलित बँक दर + ४% (वार्षिक) इतक्या व्याजदराने व्याजाच्या स्वरुपात भरपाई रक्कम द्यायची आहे. तसेच संबंधित वारसांना उशीर का झाला याबाबत देखील कळविणे बंधनकारक आहे.

६) बँकेने मयत खातेदार / ठेवीदार यांच्या दाव्यांच्या निकाली काढण्यासंदर्भात केलेली कार्यपध्दती व या संदर्भात वापरायचे प्रमाणित फॉर्म्स यांची माहिती व फॉर्म्सचे नमुने बँकेच्या अधिकृत वेबसाईट वर अपलोड केले आहेत.

७) मयत खातेदार / ठेवीदार / लॉकर खातेदारांच्या संदर्भात आलेले दावे, निकाली निघालेले दावे तसेच १५ दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित दावे कारण मिमांसासहित दरमहा होणाऱ्या अकौन्ट व खर्च नियंत्रण समितीमध्ये ठेवण्यात येतील.

---

८) *** मयत लॉकर खातेदारांच्या दाव्यांच्या निकाली काढणेसंबंधी धोरण / कार्यपध्दती ***

अ) वारस नोंद असणाऱ्या तसेच सभासद / बिगर सभासद, मयत लॉकर खातेदारांच्याबाबत :-

वारस नोंद असणाऱ्या मयत लॉकर खातेदारांच्या वारसांना लॉकर रुम मध्ये प्रवेश व मयत खातेदारांच्या लॉकरचा ताबा शाखा पातळीवरच देणेचा आहे. वारसनोंद असणाऱ्या लॉकरबाबत लॉकरमधील वस्तूंची रक्कम कितीही असो त्याचे अधिकार हे शाखाधिकारी / शाखेतील वरिष्ठ अधिकारी यांना असतील. वारसनोंद असणाऱ्या लॉकर्सचा ताबा वारसांना देताना शाखांनी खालील गोष्टींची पूर्तता करावी.

१. मयत लॉकर खातेदाराचा मृत्यु दाखला.
२. फॉर्म V - लॉकर मधील वस्तूंचा ताबा ज्याला मिळणार आहे त्या वारसदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म.
३. वारसाची के.वाय.सी. उदा. आधार/ वाहन परवाना/ पासपोर्ट / निवडणूक ओळखपत्र इत्यादी तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घेण्यात यावे.
४. वरीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर शाखेने लॉकरमधील वस्तूंची मोजदाद करण्यासाठी दिवस व वेळ ठरविण्याकरीता वारसांना लेखी स्वरुपात पत्र व्यवहार करावा. वारसांच्या समोर लॉकर मधील वस्तूंची मोजदाद करण्यासाठी शाखेने दोन स्वतंत्र पंच (जे बँकेचे सेवक व माजी सेवक नाहीत), लॉकर अधिकारी व इतर एक अधिकारी जो लॉकर विभागातील नाही अशा सर्वां समक्ष लॉकरमधील वस्तूंची मोजदाद करावी व त्याबाबतचा फॉर्म- X भरुन घ्यावा.

ब) **वारसनोंद नसणाऱ्या सभासद / बिगर सभासद, मयत लॉकर खातेदार यांच्याबाबत :-**

आपल्या बँकेने मर्यादा रक्कम (Threshold Limit) निश्चित केली असून त्याची रक्कम रु. १० लाख इतकी आहे. याचाच अर्थ असा की, रु. १० लाखांवरील वारसनोंद नसलेले दावे निकाली काढताना वारसांकडून उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) बंधनकारक असेल. काही अपवादात्मक परिस्थितीत जसे की वारसांत मतभेद नाहीत तसेच वारस हे जवळच्या रक्ताच्या

नात्यातले असतील तर अशा बाबतीत उत्तराधिकारी प्रमाणपत्र न घेता दावा निकाली काढण्याचे अधिकार हे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

वारसनोंद नसलेल्या मयत लॉकर खातेदार यांचे दावे निकाली काढताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती शाखांनी / मुख्य कार्यालयातील हिशोब विभागाने पुर्ण करावी.

१. सर्व कागदपत्रांची वारसांकडून पूर्तता झाल्यानंतरच शाखांनी दाव्यासंदर्भातील कागदपत्रांची आवक (Inward) करावी.

२. आवश्यक असणारे इंडेम्नीटी बॉण्ड / लेटर ऑफ डिस्क्लेमर किंवा नो ऑब्जेक्शन यांना योग्य प्रमाणात स्टॅम्प पेपर वारसांकडून लावण्यात आले आहेत का याची खात्री करुन मगच स्विकारावेत.

* वारसनोंद नसलेल्या लॉकर खातेदारांबाबत आवश्यक कागदपत्रे, स्टॅम्प, मंजूरी अधिकार व रक्कम मर्यादा यांची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

| **अ.क्र.** | **लॉकरमधील वस्तूंची किंमत** | **आवश्यक कागदपत्रे** | | **स्टॅम्प (₹)** | **मंजूर अधिकार** |
|---|---|---|---|---|---|
| १. | रु. ३.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म VI- ज्याला लॉकरमधील वस्तूंचा ताबा मिळणार आहे. | -- | शाखाधिकारी किंवा शाखेतील वरिष्ठ अधिकारी |
| | | २ | मृत्यु दाखला | -- | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) | ५००/- | |
| | | ५ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| | | ६ | इनव्हेंटरी फॉर्म X- पंचांच्या साक्षीने भरुन घ्यायचा फॉर्म | | |
| | | ७ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल. | ५००/- | |

| अ.क्र. | लॉकरमधील वस्तूंची किंमत | | आवश्यक कागदपत्रे | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| २. | रु. ३.०० लाख ते रु. १०.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) ज्याला लॉकर मधील वस्तूंचा ताबा मिळणार आहे. | -- | उपसरव्यवस्थापक |
| | | २ | मृत्यु दाखला | | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) | ५००/- | |
| | | ५ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) किंवा डिक्लेरेशन फॉर्म- IX (जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| | | ६ | इनव्हेंटरी फॉर्म X- पंचांच्या साक्षीने भरुन घ्यायचा फॉर्म | | |
| | | ७ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल | ५००/- | |
| ३. | रु. १०.०० लाख ते रु. २५.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) ज्याला लॉकर मधील वस्तूंचा ताबा मिळणार आहे. | -- | सरव्यवस्थापक |
| | | २ | मृत्यु दाखला | | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) किंवा वारसात मतभेद नसतील व वारस जवळच्या रक्ताच्या नात्यातील असतील तसेच बँकेच्या परिचयाचे असतील तर अपवादात्मक परिस्थितीत उत्तराधिकारी प्रमाणपत्र ऐवजी खालील प्रमाणे कागदपत्रे घेता येतील. | -- | |
| | | अ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल | ५००/- | |
| | | ब | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | क | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) किंवा नोटेराईज्ड डिक्लेरेशन फॉर्म- IX (जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| | | ५ | इनव्हेंटरी फॉर्म- X | -- | |

| अ.क्र. | लॉकरमधील वस्तूंची किंमत | | आवश्यक कागदपत्रे | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| ४. | रु. २५.०० लाख ते रु. ५०.०० लाखापर्यंत | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) ज्याला लॉकर मधील वस्तूंचा ताबा मिळणार आहे. | -- | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | २ | मृत्यु दाखला | | |
| | | ३ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate)<br>किंवा<br>वारसात मतभेद नसतील व वारस जवळच्या रक्ताच्या नात्यातील असतील तसेच बँकेच्या परिचयाचे असतील तर अपवादात्माक परिस्थितीत उत्तराधिकारी प्रमाणपत्र ऐवजी खालील प्रमाणे कागदपत्रे घेता येतील. | -- | |
| | | अ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल | ५००/- | |
| | | ब | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | क | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>नोटेराईज्ड डिक्लेरेशन फॉर्म- IX (जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| | | ५ | इनव्हेंटरी फॉर्म- X | -- | |
| ५. | रु. ५०.०० लाखांवरील | १ | वरीलप्रमाणे क्र. ४ मध्ये नमूद सर्व कागदपत्रे | वरीलप्रमाणे क्र. ४ मध्ये नमूद स्टॅम्प | मा. संचालक मंडळ |
| ६. | १ ते ५ मधील मर्यादेनुसार | | **<u>मृत्यु पत्राचे आधारे</u>** | -- | १ ते ५ मधील मर्यादेनुसार |
| | | १ | मृत्यु पत्रात नांव असलेल्या वारसाकडून / अन्य व्यक्तीकडून फॉर्म- VI | | |
| | | २ | मृत्यु दाखला | -- | |
| | | ३ | मृत्युपत्रातील नांव असलेल्या व्यक्तीची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ४ | मृत्युपत्र (Will) | -- | |
| | | ५ | मृत्युपत्राच सत्यता तसेच शेवटचे असल्याबाबत कोर्टाकडून मिळणारे लेटर ऑफ प्रोबेट / लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन | -- | |
| | | ६ | इनव्हेंटरी फॉर्म- X | | |
| | | ७ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल | ५००/- | |

| अ.क्र. | लॉकरमधील वस्तूंची किंमत | आवश्यक कागदपत्रे | | स्टॅम्प (₹) | मंजूर अधिकार |
|---|---|---|---|---|---|
| ७. | १ ते ५ मधील मर्यादेनुसार | | **<u>हरविलेल्या लॉकर खातेदारांबाबत</u>** | -- | १ ते ५ मधील मर्यादेनुसार |
| | | १ | वारसांकडून क्लेम फॉर्म (VI) ज्याला लॉकर मधील वस्तू मिळणार आहे. | | |
| | | २ | वारसांची के.वाय.सी. (उदा. आधार / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडूक ओळखपत्र इ. तसेच पॅनकार्ड स्वतंत्रपणे घ्यावे) | -- | |
| | | ३ | दावा रक्कम रु. १.०० लाखापर्यंत असल्यास FIR व Non Traceable Report- पोलीस विभागाने दिलेला.<br>दावा रक्कम रु. १.०० लाखाच्या वर असल्यास कोर्टाकडून मिळालेला Civil Death चा आदेश | -- | |
| | | ४ | लेटर ऑफ डिस्क्लेमर / नो ऑब्जेक्शन (फॉर्म VIII) ज्या वारसांनी क्लेम केला नाही म्हणजेच घरातील अन्य सदस्य | ५००/- | |
| | | ५ | वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)<br>किंवा<br>डिक्लेरेशन फॉर्म- IX<br>(जामीनदाराने भरुन द्यावयाचा फॉर्म) | ५००/- | |
| | | ६ | इनव्हेंटरी फॉर्म- X | ५००/- | |
| | | ७ | इंडेम्नीटी बॉण्ड (फॉर्म XII) वारसांनी भरुन द्यावयाचा. सोबत मुल्यांकनकाराने दिलेला मुल्यांकन अहवाल | ५००/- | |
| | | ८ | दावा रक्कम रु. २५ लाखांपेक्षा जास्त असल्यास उत्तराधिकार प्रमाणपत्र आवश्यक आहे. अन्यथा अ.क्र. ४ मध्ये नमूद कागदपत्रे घ्यावीत. | | |

९) **<u>दावा निकाली काढण्यासाठी लागणारा कालावधी :-</u>**

सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेला दावा शाखेकडे प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधीत वारसांना लॉकर इनव्हेंटरीची तारीख ठरविणेसाठी कळविणे बंधनकारक आहे.

१०) **<u>उशीरा निकाली निघणाऱ्या दाव्यांसाठी द्यावी लागणारी भरपाई :-</u>**

वर नमूद अ.क्र. ९ मध्ये दिल्याप्रमाणे बँकेकडून दावा निकाली काढण्यास उशीर झाल्यास उशीर झालेल्या प्रत्येक दिवसासाठी रु. ५,०००/- प्रमाणे भरपाई रक्कम वारसदारांना द्यावी लागेल.

११) **सभासद / बिगर सभासद, वारस नोंद नसणाऱ्या मयत ठेवीदार / खातेदार / लॉकर खातेदार यांच्या ठेवींची / लॉकर मधील वस्तुंचे मुल्यांकन रु. ५,०००/- पर्यंत असल्यास कोणत्याही स्वरुपाची स्टॅम्पड्युटी लागु नाही.**

मान्यतेस्तव सादर...

**विभाग प्रमुख** **सहा. सरव्यवस्थापक** **उपसरव्यवस्थापक** **सरव्यवस्थापक** **मुख्य कार्यकारी अधिकारी**